प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE
CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २६ ऑगस्ट २०२४**

**गोपाळकाल्याच्या शुभ मुहूर्तावर सिडको गृहसंकुलांतील उपलब्ध ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा करण्यात आला प्रारंभ**

**९०० हून अधिक कुटुंबांचे हक्काच्या घराचे स्वप्न होणार साकार**

सिडको महामंडळातर्फे कृष्ण जन्माष्टमी/गोपाळ काल्याच्या शुभ मुहूर्तावर सोमवार, दि. २७ ऑगस्ट २०२४ रोजी सिडकोच्या नवी मुंबईतील गृहसंकुलांतील एकूण ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला. एकूण ९०२ सदनिकांपैकी नवी मुंबईतील कळंबोली, खारघर व घणसोली या विकसित नोडमधील २१३ आणि सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती व वास्तुविहार-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील ६८९ सदनिका विक्रीकरिता उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

सिडकोतर्फे सातत्याने विविध उत्पन्न गटांतील नागरिकांकरिता गृहनिर्माण योजना राबविण्यात येतात. या वर्षीच्या गोपाळ काल्याच्या मुहूर्तावर उपलब्ध ९०२ सदनिकांच्या गृहनिर्माण योजनेचा प्रारंभ करण्यात आला आहे. या योजनेंतर्गत कळंबोली, खारघर आणि घणसोली नोडमधील उपलब्ध २१३ सदनिकांपैकी ३८ सदनिका या प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता आणि १७५ सदनिका या सर्वसाधारण प्रवर्गाकरिता उपलब्ध आहेत. तसेच सिडकोच्या खारघर येथील व्हॅलीशिल्प, स्वप्नपूर्ती आणि वास्तुविहा-सेलिब्रेशन गृहसंकुलांतील उपलब्ध ६८९ सदनिकांपैकी ४२ सदनिका या आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाकरिता, ३५९ सदनिका अल्प उत्पन्न गटाकरिता, १२८ सदनिका मध्यम उत्पन्न गटाकरिता आणि १६० सदनिका या उच्च उत्पन्न गटाकरिता उपलब्ध आहेत.

योजनेच्या ऑनलाइन अर्ज नोंदणीस २७ ऑगस्ट २०२४ पासून प्रारंभ होणार असून योजनेकरिता संगणकीय सोडत १० ऑक्टोबर २०२४ रोजी काढण्यात येणार आहे. ऑनलाइन नोंदणीकरिता तसेच योजनेच्या सविस्तर माहितीकरिता https://lottery.cidcoindia.com हे संकेतस्थळ उपलब्ध करून देण्यात आले आहे.

या गृहनिर्माण योजनेद्वारे नागरिकांना सर्व पायाभूत सोयी सुविधांनी परिपूर्ण असलेल्या नवी मुंबईमध्ये आपले हक्काच्या घराचे स्वप्न साकार करण्याची संधी मिळणार आहे. या गृहसंकुलांना रेल्वे, रस्ते, मेट्रो द्वारे कनेक्टिव्हिटी लाभली आहे. सिडकोच्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळासह सिडकोचे अन्य महत्त्वाकांक्षी प्रकल्प या गृहसंकुलांपासून नजीकच्या अंतरावर आहेत. यामुळे नागरिकांना एक परिपूर्ण जीवनशैली अनुभवण्याची संधी मिळणार आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**मा. संपादक महोदय,**

**वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.**

**जनसंपर्क विभाग, सिडको**